# प्रकरण – 18

## <u>इतर उपयुक्त माहिती</u>

1) <u>नियमित विचारले जाणारे प्रश्न</u>

अ) हॉस्पीटलमध्ये ब्लड बँक आहे काय?

उत्तर - हॉस्पीटलमध्ये ब्लड बँक नाही.

ब) हॉस्पीटलमध्ये (विशेष) प्रायव्हेट रुम आहे काय?

उत्तर - हॉस्पीटलमध्ये (विशेष) प्रायव्हेट रुम नाही.

क) वरिष्ठ डॉक्टर उपलब्ध आहेत काय?

उत्तर - ब-याच विभागांत वरिष्ठ डॉक्टर उपलब्ध आहेत.

ड) त्यांना औषधासाठी पैसे द्यावे लागतात का?

उत्तर – नाही. औषधे मोफत आहेत.

इ) हॉस्पीटलमध्ये अपघात / तात्काळ विभाग आहे काय?

उत्तर – हॉस्पीटलमध्ये अपघात विभाग / तात्काळ सेवा/ बाहयरुग्णविभाग 24 तास कार्यरत आहे आणि सर्व आकस्मित रुग्णांना तपासले जाते आणि गरजेनुसार दाखल केले जाते. मेडिकोलिगल केसेस प्रथम घेऊन त्यांचेवर प्रथमोपचार उपचार करुन पुढे उच्च सुविधा असणा-या हॉस्पीटलमध्ये गरजेनुसार पाठविल्या जातात.

फ) त्यांना एक्सरे-इसिजीसाठी पैसे द्यावे लागतात काय?

उत्तर – होय. एक्सरे आणि इसिजीसाठी ठरवलेली फी द्यावी लागते.

2) जर रुग्णांना काही अधिक माहिती हवी असल्यास त्यांनी को-या कागदावर आपले नांव, पत्ता, टेलिफोन नंबर, हवे असलेले प्रमाणपत्र/दस्ताचे नांव, आवश्यक असलेली माहिती, कारण आणि त्यासाठी लागणारी फी भरणा करुन, अर्जावर खाली आपली स्वाक्षरी करुन तो अर्ज मंजूरीनंतर नमूद वेळेत प्रमाणपत्र/दस्त दिला जातो.

3) रुग्ण/नागरिक यांना देण्यात येणारे ट्रेनिंग (प्रशिक्षण) रुग्ण आणि नागरिक यांना खालील शिक्षण हॉस्पीटलकडून दिले जाते.

प्रसूतीपूर्व काळजी – जलसंजिवनी

फॅमिली प्लॅनिंग - एच.आय.व्ही./एडस् बद्दलची महिती व समुपदेश

लसीकरण करणे, स्तनपान करणे.

शिक्षीत आणि अनुभवी अधिका-यांकडून ट्रेनिंग बाहयरुग्ण विभागातच दिले जाते. दृकश्राव्य साधने आणि आ.ई.सी. उपकरणे प्रशिक्षणासाठी वापरली जातात. प्रशिक्षण विनामुल्य असते. सदरहू ट्रेंनिंग सत्रास हजर राहण्यासाठी हॉस्पीटलशी संलग्न असलेल्या आरोग्य विभागातील कर्मचा-यांकडून आयोजन केले जाते.

4) हॉस्पीटलकडून देण्यात येणारे प्रमाणपत्र –

| अ.क्र. | प्रमाणपत्राचे नांव | रक्कम | अर्ज करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | वयाचा दाखला | रुपये 30/- | वैद्यकीय आलेख तंत्रज्ञ |
| 2 | अंडर ट्रीटमेंट दाखला | रुपये 30/- | वैद्यकीय आलेख तंत्रज्ञ |
| 3 | फीटनेस दाखला | रुपये 30/- | वैद्यकीय आलेख तंत्रज्ञ |

ज्यांना वरीलप्रमाणे कोणतेही प्रमाणपत्र हवे असेल त्यांनी वैद्यकीय अभिलेख तंत्रज्ञामार्फत यांना को-या कागदावर अर्ज करुन आपले नांव, पत्ता, टेलिफोन नंबर, कोणता दाखला पाहिजे आणि सदर अर्जावर खाली आपली स्वाक्षरी करुन, केस पेपरची झेरॉक्स प्रत बरोबर जोडावी. फी भरणा करावा. अर्ज संबंधित विभागाच्या डॉक्टरकडून मंजूर करुन/प्रमुख वैद्यकिय अधिकारी यांचेकडून मंजूर करुन घ्यावा. त्यानंतर त्याच दिवशी वैद्यकिय अभिलेख तंत्रज्ञाकडून दाखला देण्यात येईल.